ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय 'अर्थशास्त्र'

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २८ मार्च, १९५१ अंक १३

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६.
मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.
तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१२,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहूपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. साधंत, जनरल मॅनेजर.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —
१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन.
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल्. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.
ठेवींवर व्याज—
चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षें ३ टक्के.
शाखा स्थानिक–(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः–४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी
## दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधि पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

## रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

## पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८

दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**आर्थिक नियोजनासंबंधीं चर्चा**—राज्य सरकारांच्या विकास-योजनांची चर्चा करण्यासाठी निरनिराळ्या प्रतिनिधींना लवकरच दिल्लीला पाचारण करण्यांत येणार आहे. विकास-योजनांचें दोन प्रकारांत वर्गीकरण करण्यांत येणार आहे. ज्या योजना देशांतच भांडवल उभारून करतां येतील त्यांचा एक वर्ग, आणि ज्या योजनांना परदेशीय भांडवलाची मदत लागेल त्यांचा दुसरा वर्ग.

**भारतीय रुपयाची हुंडणावळ**— पाकिस्तानमधील चेंबर ऑफ कॉमर्स अगर इतर व्यापारी संघांचे प्रतिनिधी धंद्यासाठी म्हणून भारतास यावयास निघाल्यास त्यांना दर तीन महिन्यांस ३५० पाकिस्तानी रु. ची हिंदी हुंडणावळ मिळूं शकेल असें पाकिस्तानच्या स्टेट बँकेनें जाहीर केलें आहे.

**चीनमधील चलनवाढ**—चीनमधील ब्रिटनचे प्रतिनिधी सर जॉन हचिन्सन नुकतेच हाँगकाँगला परत आले. चीनमधील कम्युनिस्ट राज्यासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, देशांतील १० वर्षांची जुनी चलनवाढ थांबवून किंमती स्थिर करण्यांत त्या सरकारनें यश मिळविलें आहे. त्याचबरोबर, व्यवहाराला बाधक होईल इतकी चलनाची टंचाई त्यांनीं टाळली आहे.

**स्फोटकांचा कारखाना**—खाणींत व इतर ठिकाणीं वापरण्यांत येणारीं स्फोटक द्रव्यें तयार करण्याचा एक कारखाना कलकत्ता येथें काढण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे. मोठा स्फोट करूं शकणारीं अशीं १ कोटी रु. चीं द्रव्यें भारताला दरवर्षी ब्रिटनकडून आयात करावीं लागतात.

**पेट्रोलचा खप वाढला**— गेल्या वर्षी २२ ऑक्टोबरपासून पेट्रोलवरील नियंत्रण रद्द करण्यांत आलें. तेव्हांपासून निरनिराळ्या राज्यांत पेट्रोलचा खप वाढल्याचें दिसून आलें आहे. नोव्हेंबर १९५० मध्यें पेट्रोलच्या खपांत १२·१ टक्के वाढ झाली आणि डिसेंबर १९५० मध्यें ऑक्टोबरमधील खपाशीं तुलना करतां २६·१ टक्के वाढ झाली. कांहीं भागांत तर नियंत्रण असलेल्या काळाच्या मानानें ४० टक्के वाढ झालेली आहे.

**कृत्रिम खताची आयात**—१९४९-५०सालीं रशियानें भारताला सर्वांत अधिक सल्फेट ऑफ अमोनिया ह्या कृत्रिम खताचा पुरवठा केला. भारतानें रशिआकडून ८७,००० टन खत खरेदी केलें. त्याची किंमत २,४१,४५००० रुपये झाली. वरील सालीं भारतानें एकूण १,७०,८०० टन सल्फेट आयात केलें. त्याची किंमत ५,०४,७४,००० रुपये झाली. रशिआशिवाय इंग्लंड, बेल्जम, अमेरिका, इ. देशांकडूनहि आयात करण्यांत आली.

**ग्रामीण विभागांतील बँकांची सोय**—म्हैसूर सरकारचे मजूर मंत्री श्री. के. टी. भाष्यम् ह्यांनी संस्थानी बँकेंतील नोकर संघाच्या उद्घाटन प्रसंगीं भाषण केलें. देशाच्या उत्कर्षांत बँकेच्या नोकरांस मोठा वांटा उचलतां येईल असें त्यांनीं सांगितलें. बँकेच्या चालकांनीं व नोकरांनीं कायदेशीर हक्कांचा काटेकोर उपयोग न करतां उभयतांमधील मतभेद विचारविनियमानें मिटवावे असा सल्ला त्यांनीं दिला. ग्रामीण विभागांत बँकांची सोय वाढविण्याचें महत्त्वहि त्यांनीं सांगितलें.

**बर्नार्ड शॉ ह्यांच्या पत्रांची किंमत**—दिवंगत नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांनीं लिहिलेलीं ३७ पत्रें नुकतींच विकण्यांत आलीं असतां त्यांची किंमत ११५ पौंड आली. ह्या पत्रांपैकीं २३ हातानें लिहिलेलीं आणि १४ टंकलिखित करून सही केलेलीं आहेत. शॉ ह्यांचे एक समकालीन नाटककार मि. मिनेरो ह्यांना तीं लिहिलेलीं आहेत. नाटकांवरील कर, सेन्सॉरशिप, इ. विषयांवर मि. शॉ ह्यांचीं मतें वरील पत्रांतून व्यक्त झालेलीं आहेत. कांहीं कांहीं पत्रें सहा पानांचीं आहेत.

**कॉफीच्या व्यवसायांतील यशस्वी स्त्री**—कूर्गमधील कॉफीच्या शेतींत यशस्वी झालेल्या श्रीमती सक्कम्मा आपल्या वयाच्या ७२ व्या वर्षी नुकत्याच निधन पावल्या. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांचे पति निवर्तले. त्यानंतर त्यांनीं आपल्या अंगच्या कर्तबगारीनें शेती, उद्योगधंदे आणि व्यापार इ. क्षेत्रांत उत्कृष्ट यश मिळविलें. बंगलोर येथें सक्कम्मा कॉफी वर्क्स ही कंपनी फार प्रसिद्ध आहे. ह्या कंपनीच्या अनेक शाखा दाक्षिण हिंदुस्थानभर पसरलेल्या आहेत.

**केळयाच्या पिठाचे पाव**—केळीं सुमारें आठवडाभर उन्हांत सुकवून त्यांचें पीठ करावें व त्या पिठाचे पाव करावे, अशी माहिती मिळते. हे पाव रंगाला आणि चवीला गव्हाच्या पिठाच्या पावासारखे लागतात असें म्हणतात.

**शास्त्रीय चित्रपटांसाठी खास सोय**—मास्कोमधील एका प्रमुख रस्त्यावर 'शास्त्रें आणि ज्ञान' ह्या नांवाचें एक चित्रपटगृह नुकतेंच सुरू करण्यांत आलें आहे. ह्या चित्रपटगृहांत फक्त शास्त्रीय विषयांवरील अनुबोधपट दाखविण्यांत येणार आहेत. कांहीं अनुबोधपट फ्रान्समध्यें दाखविण्यांत आलेले आहेत.

**बर्नार्ड शॉ ह्यांची मालमत्ता**—मि. बर्नार्ड शॉ ह्यांच्या मालकीची मालमत्ता सुमारें ३,००,००० पौंडांची होती. ह्या मालमत्तेवरील मृत्यु-कर म्हणून १,८५,००० पौंड नुकतेच भरण्यांत आले. मि. शॉ ह्यांच्या नाटकांपासून व पुस्तकांपासून किती उत्पन्न येईल ह्याचा अंदाज करतां येत नसल्यामुळें त्यावरील मृत्यु-कर ठरवितां येणें कठीण झालें आहे. मि. शॉ ह्यांच्या पुस्तकासंबंधींचे हक्क ५० वर्षांनीं रद्द होतील. तोंपर्यंत त्यापासून होणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज करणें मृत्यु-कर घेण्यासाठी जरूर आहे.

**आत्महत्यांचें वाढतें प्रमाण**—१९४६ ते १९५१ च्या दरम्यान ऑक्सफर्ड विद्यापीठांतील विद्यार्थ्यांत आत्महत्या करणाऱ्यांचें प्रमाण वाढलें असल्याचें दिसून आलें आहे. इतर विद्यापीठांतील प्रमाणापेक्षां हें प्रमाण सातपट अधिक आहे. एका टर्मपेक्षां अधिक काळ गैरहजर रहाणाऱ्या ऑक्सफर्डमधील विद्यार्थ्यांपैकीं निम्मे मानसिक दृष्ट्या आजारी असतात, असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २८ मार्च, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अवमूल्यनापासून अपेक्षित फलसिद्धि झाली काय ?

रुपयाचें दीड वर्षापूर्वी अवमूल्यन करण्यांत आलें, तें आतां बदलून कांहीं अंशीं तरी रुपयाची किंमत पूर्व स्थितीवर आणून ठेवता येईल किंवा नाहीं ह्याविषयीं सध्या चर्चा चालू आहे. डॉलर चलनाचा पडणारा तुटवडा थांबविण्यासाठी आणि त्यासाठी निर्यातीस प्रोत्साहन देऊन आयात मर्यादित करण्यासाठी पौंडाचें अवमूल्यन करणें भाग पडणें, असा खुलासा तेव्हांचे ब्रिटिश अर्थमंत्री सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं केला होता. हिंदी रुपयासहि ब्रिटिश पौंडाचें अनुकरण करणें भाग पडलें. पौंडाच्या अवमूल्यनाचे सुपरिणाम कसे झाले, ह्याची आकडेवार माहिती सध्याचे ब्रिटिश अर्थमंत्री मि. गेटस्केल ह्यांनीं नुकतीच सांगितली. १९४९ मध्यें १५० कोटी डॉलर्सची तूट होती, परंतु १९५० मध्यें २३० कोटी डॉलर्सची सुधारणा होऊन, उलट ८० कोटी डॉलर्सचा वाढावाच उरला. १९५० चे प्रारंभीं सोनें व डॉलर ह्यांची पुंजी १६८ कोटी डॉलर्स होती, ती वर्षअखेर ३३० कोटी डॉलर्सवर गेली. अशा रीतीनें १९५० सालीं डॉलरची तूट तर नष्ट झालीच; उलट डॉलरचा मोठा निधी निर्माण होण्याइतकी परिस्थिति शक्य झाली.

भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांतहि अशीच अनुकूल सुधारणा आली आहे. १९४९ मधील १८७ कोटी रुपयांच्या तुटीचें १९५० मध्यें ४७ कोटी वाढाव्यांत रूपांतर झालेलें आहे. प्रत्यक्ष मालाची आयात निर्गत व देण्याच्या इतर बाबी ह्या सर्व विचारांत घेतल्या, तर ४२ कोटींचा वाढावा पदरांत पडलेला आढळतो. सप्टेंबर १९४९ च्या पहिल्या आठवड्यांत भारताच्या पौण्डी शिलकींत ७७६ कोटी रुपये होते. सप्टेंबर १९५० अखेर ते ८०७ कोटी रुपयांवर गेले आणि १९५१ च्या जानेवारींत ते आणखी वाढून ८४३ कोटी रुपये झाले. अशा रीतीनें, परराष्ट्रीय व्यापारांतील अनुकूल तफावत भारताचें परराष्ट्रांतील येणें वाढवीत आहे.

अवमूल्यनासंबंधीं तांतडीनें निर्णय घेण्यांत आला, तेव्हांचे मानानें आतांची परिस्थिति पुष्कळच पालटली आहे. कोरियांतील युद्धामुळें आणि जागतिक युद्धतयारीमुळें मालाच्या किंमती बेसुमार वाढत चालल्या आहेत. ज्या देशांनीं आपल्या चलनाचें अवमूल्यन केलें आहे, अशांना आतां पूर्वीइतका परराष्ट्रीय माल मिळूं शकत नाहीं आणि त्यासाठी किंमतहि भरमसाट पडत आहे. भारताचा परराष्ट्रीय व्यापार बहुंशीं पौंडी चलनगटांतील देशांशींच असल्यामुळें, त्या चलनगटांत हिंदी माल पूर्ववत खपावयाचा असेल तर पौंडाच्या मानानें रुपयाची किंमत चढीची ठेवणें नुकसानकारक होईल; रुपयाचें अवमूल्यन केलें नाहीं तर हिंदी मालाची निर्गत कमी होऊन आयातहि आणखी उतरवावी लागेल, अशी विचारसरणी रुपयाच्या अवमूल्यनाच्या बुडाशीं होती. ही परिस्थिति आतां उरली आहे काय, आणि आजची परराष्ट्रीय व्यापाराची स्थिति रुपयाची किंमत थोडीतरी वाढविण्यास अनुकूल आहे किंवा कसें, ह्याबद्दल आतां चर्चा ऐकूं येऊं लागली आहे. अवमूल्यनानंतर आपली व्यापारी घडी सुधारली आहे व पौंडी शिलकांत भर पडत आहे ह्याविषयीं शंकाच नाहीं. ह्या गोष्टी पुढील धोरणाचे दृष्टीनें काय सुचवितात व रुपयाची किंमत वाढविणें इष्ट व फायदेशीर होईल किंवा नाहीं, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत.

---

### पाकिस्तानी रुपयाच्या किंमतीस इं. मो. फंडाची मान्यता

सप्टेंबर, १९४९ मध्यें पौंडाचें अवमूल्यन करण्यांत आलें, त्यापूर्वी १ अमेरिकन डॉलर = ३·३०८५२ रुपये अशी हुंडणावळ हिंदी व पाकिस्तानी दोन्ही रुपयांचे बाबतींत होती. सप्टेंबर, १९४९ मध्यें हिंदी रुपयाची डॉलरमधील किंमत पौंडाचें अनुकरण करून ३०·५% नें कमी करण्यांत आली, परंतु पाकिस्ताननें मात्र आपल्या रुपयाची मूळ किंमतच कायम राखली. नुकत्याच झालेल्या हिंद-पाकिस्तान व्यापारी करारांत पाकिस्तानच्या रुपयाची ही किंमत कबूल करणें भारतास भागच पडलें. इंटर नॅशनल मोनिटरी फंडानें १ डॉलर = ३·३०८५२ पाकिस्तानी रुपये हा दर आतां मान्य केला असल्याचें जाहीर केलें आहे. पौंडाच्या अवमूल्यनापूर्वी १ पौंड = १३⅓ रुपये असा दर होता आणि १ पौंड=४·०३ डॉलर होते. १३⅓ ह्याला ४·०३ नें भागिलें म्हणजे ३·३०८५२ हा भागाकार येतो. पाकिस्तानी रुपयाची अधिकृत मान्यता मिळालेली किंमत खालीलप्रमाणें होते.

१ पाकिस्तानी रुपया=०·२६८६०१ ग्रॅम सोनें
११५·७९८ पाकिस्तानी रुपये= १ औंस सोनें
३·३०८५२ पाकिस्तानी रुपये=१ अमेरिकन डॉलर
१ पाकिस्तानी रुपया= ३०·२२५ अमेरिकन सेंट

---

### वर्गणी व भाषणें ह्यांचें व्यस्त प्रमाण

संयुक्त राष्ट्रसंघटनेंतील एकूण भाषणांत जेवढे शब्द उच्चारले गेले, त्यांपैकीं एक दशांशापेक्षां अधिक शब्द अँद्री व्हिशिन्स्की ह्यांच्या मुखांतून बाहेर पडले. रशिया, चेकोस्लोव्हाकिया, पोलंड, युक्रेन, बायलोरशिया, एल सॅलव्हेडॉर, ह्या राष्ट्रांचे प्रतिनिधी असेंब्लीचा फार वेळ घेत असतात. संयुक्त राष्ट्रसंघटनेंतील बोलण्याच्या वेळेपैकीं ४०% वेळ रशियाचा गट घेतो, परंतु त्याला येणाऱ्या खर्चाच्या फक्त १०·१८ वर्गणी देतो. हा उलट, अमेरिका ३·८९२% वर्गणी देऊनहि फक्त ४·४९% वेळेचाच उपयोग करते.

---

### इराणच्या मागोमाग इराक

इराणनंतर आतां इराकहि तेथील (इराकी) पेट्रोलियम कंपनीविरुद्ध तक्रार करूं लागला आहे. तूर्त इराकी सरकार नफ्याचा जास्त वाटा मागीत आहे, परंतु कंपनी तो देण्यास तयार नाहीं. पहिल्या महायुद्धांत व नंतर ब्रिटिश मदतीमुळेंच इराण स्वातंत्र्य मिळवूं शकला, हें सुप्रसिद्ध आहेच.

### दि म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि., बंगलोर

वरील कंपनीनें ३१ डिसेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षी १,५१,३४८ रु. ठोक नफा मिळविला. व्यवस्था खर्च, पगार, घसारा, बोनस, इत्यादि वजा जातां उरलेला ३९,३१२ रुपयांचा निव्वळ नफा ताळेबंदांत घेण्यांत आला आहे. गेल्या वर्षीचा निव्वळ नफा फक्त ४०७ रु. होता. मागील शिल्लक नफा धरून वाटणीसाठीं ४१,९५९ रु. यतात. त्यांतून ६¼% डिव्हिडंडसाठी ४०,००० रुपयांचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. अहवालाचे वर्षी कारखान्यांत ६,९३,००० रुपयांचा ५८० टन काच माल तयार झाला. १९४९ मधील उत्पादन ५,१४,००० रुपयांचें ४७० टनांचें होतें. मालाला किंमत बरी आली आणि कारखानाहि वर्षभर चालला. अशीच परिस्थिति १९५१ मध्येंहि राहील अशी अपेक्षा आहे. कंपनीच्या १०,०१,१५१ रुपयांच्या ताळेबंदापैकीं ९,२०,२४५ रु. वसूल भांडवल असून १,८०,२९१ रुपयांचे रिझर्व्ह व इतर फंड आहेत. मुदती ठेवी फक्त ११,५०० रुपयांच्या आहेत. दि ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी, हिचेकडे म्हैसूर ग्लास अँड एनॅमल वर्क्स लि. ची मॅनेजिंग एजन्सी असून तिचे प्रतिनिधी श्री. शंकरराव ओगले हे व्यवस्था पहात आहेत. म्हैसूरमधील औद्योगिक क्षेत्रांत त्यांनीं चांगलाच लौकिक संपादन केलेला असून त्या बाजूच्या कित्येक कंपन्यांना त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा फायदा होत आहे. कंपनीची वार्षिक सभा ता. १५ एप्रिल रोजीं आहे.

धी
युनायटेड
कमर्शिअल
बँक लि.

वसूल झालेलें भांडवल :
२ कोटी रुपये
राखीव निधी :
६० लक्ष रुपये

श्री. जी. डी. बिरला
चेअरमन
श्री. बी. टी. ठक्कर
जनरल मॅनेजर

[illegible]

मुख्य कचेरी: कलकत्ता

**गांधीजींच्या पत्रांची किंमत**—महात्मा गांधींनीं लंडन मधील आपल्या एका मित्राला लिहिलेलीं तीन पत्रें लंडनमध्यें नुकतींच विकण्यांत आलीं; त्यांची किंमत ४० पौंड आली. महात्माजींच्या ह्या मित्राचें नांव मि. हॉवहौस असें असून ते अत्यंत साधेपणानें रहातात. गेल्या युद्धाच्या आरंभीं त्यांनीं गांधीजींच्या उक्तींचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. वरील पत्रांपैकीं एका पत्रांत महात्माजींनीं चरख्यावरील आपली अढळ निष्ठा व्यक्त केलेला आहे.

## पाहिजेत

### शेतकरी सहकारी संघ लि. कोल्हापूर या संस्थेंत खालील जागा भरणें आहेत.

१. मॅनेजर ( एक जागा )

ग्रेड रु. २५०—१०—३०० ई. बी. १५—३७५.

शैक्षणिक लायकी—विश्वविद्यालयाचा पदवीधर असून १० वर्षें एकाद्या व्यापारी कंपनींत अथवा सहकारी बँकेंत अथवा सरकारी ऑफिसांत अनुभव पाहिजे. सहकारी खरेदी विक्री संघांत अनुभव असलेल्यास अधिक पसंत केलें जाईल.

२. सेक्रेटरी ( एक जागा )

ग्रेड रु. २००—१०—२५० ई. बी. १०—३००.

शैक्षणिक लायकी— विश्वविद्यालयाचा पदवीधर असावा, एलएल्. बी. असल्यास उत्तम. निदान ५ वर्षें एकाद्या व्यापारी कंपनींत अगर सरकारी ऑफिसांत अगर सहकारी बँकेंतील कामाचा अनुभव पाहिजे. सेक्रेटरीच्या कामाची माहिती असलेल्यासच विशेष पसंत केलें जाईल.

३. अकौंटंट ( एक जागा )

ग्रेड रु. २००—१०—२५० ई. बी. १०—३००

शैक्षणिक लायकी— विश्वविद्यालयाचा पदवीधर. अकौंटन्सी घेऊन बी. कॉम. असल्यास उत्तम. व्यापारी कंपनींत अगर सहकारी बँकेंत निदान ५ वर्षें कामाचा अनुभव असावा. अकाटंसी डिप्लोमा असल्यास अधिक लायक समजला जाईल.

४. ऑडिटर ( एक जागा )

ग्रेड रु. २००—१०—२५० ई. बी. १०—३००

शैक्षणिक लायकी—अकौंटंटच्या जागेप्रमाणेंच. तथापि ऑडिट लाईनमध्यें उत्तम अनुभव पाहिजे.

५. ब्रँच मॅनेजर्स व इन्स्पेक्टर्स ( सहा जागा )

ग्रेड रु. १५०—५—२०० ई. बी. १०—२५०

शैक्षणिक लायकी—विश्वविद्यालयाचा पदवीधर. शक्यतों बी. ए., बी. कॉम अथवा बी. एजी. असावा व सहकारी खरेदी विक्री संघांत अनुभव असावा. बाजार रिवाज व शेतकी सांठा पैसा पुरवठा बाबतचें ज्ञान असलेल्यास अधिक पसंत केलें जाईल.

उत्तम अनुभविक लोकांस अधिक पगारावर नेमण्यांत येईल. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स वेळोवेळीं ठरवितील त्याप्रमाणें महागाई भत्ता मिळेल. मराठी भाषा येत असावी. उत्तम अनुभवी लोकांचे बाबतींत पदवीचा विचार विशेष केला जाणार नाहीं. वय, शैक्षणिक लायकी, कामाचा अनुभव, सांप्रत पगार, वगैरे माहितीसह गरजूंनीं सर्टिफिकेटसह ता. १०—४—५१ चे आंत खालील पत्त्यावर अर्ज पाठवावेत.

ता. गो. मोहिते,
मॅनेजिंग डायरेक्टर
शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर

श्री.

# दी आदर्श कृषि संस्था लि. धुळें (प. कान्हदेश)

(स्थापना १९४५)

## नंदनवन – डेअरी – योजना

सातपुडा पर्वताच्या विस्तीर्ण अशा जंगलाजवळ चाऱ्याची विपुलता, पाण्याची सोय, आग्रारोड लगत, अशा अंदाजी ६०० एकर जमिनीचा सलग भाग घेतला असून अद्यावत पद्धतीनें व मोठ्या प्रमाणावर दुग्ध-व्यवसाय करावयाचें ठरविलें आहे. दहिवद, तालुका शिरपूर, या गांवीं जमिनी असून हें ठिकाण धुळ्यापासून ३६ मैल व नरडाणा स्टेशन पासून १९ मैल आहे.

सुरवातीस १५० दुभतीं जनावरें ठेऊन पांच वर्षांचे अवधींत २,५०० पर्यंत वाढ करावयाची आहे.

## योजनेचें अंदाजपत्रक

<table>
<tr><th colspan="3">भांडवली खर्चः—रुपये ६,०६,१००/-</th><th rowspan="2">शेरा</th></tr>
<tr><th>जनावरें</th><th>मशिनरी</th><th>इमारती.</th></tr>
<tr><td>(१) दुभतीं रु. २,४५,०००<br>(२) वळू रु ७,०००<br>(३) बैल रु. ५,०००<br>एकूण रु. २,५७,०००</td><td>(१) लॅबोरेटरी, साहित्य, एंजिनें, मिल्क कॅन्स, चाफ कटर्स, क्रीम सेपरेटर्स...... रु. ४५,३००<br>(२) वाहतुकीकरतां मोटारी, बैलगाड्या वगैरे...रु.२९,०००<br>एकूण रुपये ७४,३००</td><td>(१) जनावरांकरतां शेडस् रु. २,२५,०००<br>(२) नोकरवर्गाकरितां इमारती रु. ५०,०००<br>एकूण रु. २,७५,०००</td><td rowspan="3">वार्षिक उत्पन्न व खर्च विचारांत घेतां सालिना रु. ८०,०००/– कमाई होईल असा अंदाज आहे. नमुद केलेल्या भांडवलावर व वार्षिक खर्चांत चाऱ्याचा, बागाइतीचा, जनावरें सांभाळण्याचा, असे दुय्यम धंदे होऊ शकतील व त्याची कमाई रु. ८०,००० भरच टाकील.</td></tr>
<tr><th>वार्षिक खर्चः– रु. १,५४,४८५/-</th><th colspan="2">वार्षिक उत्पन्नः– रु. ३,३४,१२५/-</th></tr>
<tr><td>(१) चारा, दाणा वगैरे (पिकविलेल्या चाऱ्याची किंमत वगळून) रु. १,७६,४८५<br>(२) नोकरवर्ग— मॅनेजर, डॉक्टर, एंजिनियर, वगैरेसह... रु. ५२,०००<br>(३) मशिनरींचा, औषधी व इतर किरकोळ खर्च रु. २६,०००<br>एकूण रु. २,५४,४८५</td><td colspan="2">(१) दररोज ३५०० पौंड दूध, वर्षाचें १२,७७,५०० पौंड दूध ४ पौंडांस १ रु. या भावानें, रु. ३,११,८७५<br>(२) खत वगैरे रु. २२,२५०<br>एकूण रु. ३,३४,१२५</td></tr>
</table>

ही योजना तयार करतांना मुंबई राज्याचे डेअरी डेव्हेलपमेंट ऑफिसर यांचा सल्ला घेऊन आम्ही तयार केली आहे. सदर्हू डेअरी डेव्हेलपमेंट ऑफिसर वेळोवेळीं मार्गदर्शन व शक्य तें सहाय्य करणार आहेत. डेअरी तज्ञ, डॉ. वसंतराव पाटील एम्. एससी., पी एच्. डी., (अमेरिका) यांनीं योजना समजावून घेऊन, व्यवसायाकरतां फारच सोयीची जागा निवडल्याचें व अंदाजपत्रकही बरोबर असल्याचा अभिप्राय दिला असून, त्यांना शक्य होईल तितकें सहकार्य करण्याचें आश्वासन दिलें आहे. धुळें येथील पांझरापोळ संस्थेचे मॅनेजर, श्री. कौजलगी यांनीं या योजनेमुळें भांडवल गुंतविणारास निश्चित कमाई होईल, असा अभिप्राय दिला आहे.

ह्या धंद्याकरतां शेअर्स विकून व ठेवी स्वीकारून भांडवल जमविण्याचें संस्थेनें ठरविलें आहे.

संस्थेच्या शेअरहोल्डरांना गेल्या तीन वर्षांत प्रतिवर्षी ६%, ६% व ८% नफा मिळाला आहे. संस्थेची कमाई प्रतिवर्षी वाढत आहे. एका शेअरची किंमत रु. २५/– असून, एका इसमास कितीही शेअर्स घेतां येतात. शेअर्सची विक्री चालू आहे.

संस्था मुदत ठेवी स्वीकारते. व्याजाचे दर द. सा. द. शें. ६, ६½ व ७. मुदत अनुक्रमें १२, १८, व २४ अगर अधिक महिने.

द. वि. जावडेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भारतीय संसदेंत आर्थिक घडामोडींचा आढावा

श्री. चिंतामणराव देशमुख हे नामवंत अर्थज्ञ आहेत. त्यांचें देशप्रेम देशभक्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोणाही व्यक्तीपेक्षां कमी नाहीं. आणि असलें तरी जें देशहितकर तें निर्भीडपणें मांडण्यांत त्यांची हातोटी आहे. गेल्या दोन–तीन वर्षांप्रमाणें या वेळीं अर्थसंकल्पांतील ( बजेटांतील ) मजकूर संसदेंतील अर्थमंत्र्यांच्या भाषणापूर्वींच प्रसिद्ध झाला नाहीं याचें श्रेय श्री. देशमुख यांनाच दिलें पाहिजे.

१९५१–५२ च्या अर्थसंकल्पाच्या निमित्तानें त्यांनीं भारताच्या आर्थिक प्रश्नांचा आढावा घेतला. तो जितका वस्तुनिष्ठ तितकाच समतोल होता. तत्त्वज्ञान, व्यवहार आणि सहानुभूति यांचा मनोरम आविष्कार श्री. देशमुख यांच्या भाषणांत आढळतो.

फाळणीनंतर कापूस व ताग यांचा तुटवडा पडूं लागला. मध्यंतरींच्या कांहीं काळानंतर भारत–पाकिस्तान व्यापार स्थगित झाला. इतर देशांकडून पुरेसा कापूस पुरवठा होईना. घ्यावयाला पुरेसे पैसेही नव्हते. किंमती वाढत होत्या. पाकिस्तानांतील ताग इतरत्र जाऊं लागला. भारतांतील ताग–कारखाने कच्च्या मालाचे अभावीं बंद पडूं लागले. गोणपाट व पोती यांचेऐवजी कापड आणि कागदी पिशव्या यांचा उपयोग सर्वत्र होऊं लागला. तागवस्तूंचा उपयोगच कालांतरानें करावयाचें सोडून देण्यांत आलें तर भारताच्या तागाच्या मक्तेदारीवरच गदा येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. नुकत्याच झालेल्या भारत-पाकिस्तान कराराची पार्श्वभूमि ही अशी आहे.

कोरियांत युद्ध सुरू झाल्यापासून साऱ्याच देशांत साऱ्याच वस्तूंची कमतरता वाढूं लागली आहे. युद्धोपयोगी साधनांचे सरकारी सांठे वाढूं लागले; किंमती भडकल्या. किंमती उतरण्या ऐवजी माल पुरवठा कसा करावयाचा आणि त्यांच्या किंमती काबूंत कशा ठेवावयाच्या ह्या प्रश्नाला महत्त्व प्राप्त झालें.

पोलाद, सिमेंट आणि कोळसा यांचें उत्पादन वाढलें. तथापि जीवनोपयोगी व परदेशांतून पैसे आणणाऱ्या कापड व ताग धंद्यांत, तसेंच साखरेच्या उत्पादनांत घटच झाली. देशांतील दुष्काळी परिस्थितीमुळें परदेशांतून मोठ्या प्रमाणावर धान्य आणावें लागलें. धान्य पदार्थांच्या किंमती परदेशांत चढत असून त्यांच्या वहातुकीकरितां पुरेशा बोटी मिळत नाहींत.

रुपयाचें अवमूल्यन आणि कोरियन युद्ध यामुळें एक मात्र फायदा झाला. येथून परदेशीं जाणाऱ्या मालांत, त्यांच्या किंमतींत, कस्टम्सच्या उत्पन्नांत, खूपच वाढ झाली. कापडाची निर्गतहि पुष्कळ वाढली. परदेशांतील धान्य आणि इतर वाढलेली खरेदी भागविण्याला या वाढत्या निर्गतीचा फारच उपयोग झाला.

तथापि ही स्थिति कायम राहील असें नाहीं. देशांतील कापसाच्या दुष्काळामुळें यापुढें कापडाची निर्गत कमी करावी लागणार आहे. परदेशांतून यावयाच्या मालाच्या किंमती वाढत आहेत. परदेशी धान्याची आयातहि वाढणार आहे.

परदेशी धान्य आणि कच्चा माल यांच्या किंमती वाढल्या कीं देशांतील महागाईही वाढूं लागते. जीवन कठीण होतें. शिवाय परदेशांत पुष्कळ भाव मिळतो म्हणून तिकडे वाढत्या दरानें माल पाठविला आणि तो पैसा हातीं आला कीं हा जास्तीचा पैसा महागाई वाढण्यास कारणीभूत होतो. म्हणून, सरकारचें धोरण जकाती वाढवून हा वाढता पैसा व्यवहारांतच येऊं द्यावयाचा नाहीं असें असावें लागतें.

१९५१–५२ च्या अर्थ-संकल्पाचा विचार करतांना एक सूत्र लक्षांत ठेविलें पाहिजे असें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें. "महागाईच्या ( चलनवृद्धीच्या ) काळांत कर बसवून आणि कर्जे उभारून देशांतील उपलब्ध वस्तूंच्या पुरवठ्यानुसार चलनाचा पुरवठा कमी जास्त करणें सरकारचें धोरण असलें पाहिजे. जमेपेक्षां खर्च जास्त असला ( सरकारी अर्थ-संकल्प तुटीचा असला ) तर महागाईत वाढ होते. शिलक रकमेंतून ही तूट भरून काढली तरी महागाईत वाढ होण्याचें थांबत नाहीं. यावर एकच उपाय. खर्चापेक्षां उत्पन्न जास्तीच असलें पाहिजे. सरकारी उत्पन्न कमी पडत असलें तर कर व कर्जरूपानें तें भरून काढलें पाहिजे."

सरकारी खर्चाची तोंडमिळवणी करण्याबरोबरच देशांतील वाढत्या महागाईवर तोडगा म्हणून ही करवाढ करण्यांत येत आहे असाच याचा अर्थ आहे. करवाढ मुख्यतः चैनीच्या पदार्थांवर केली असून करवाढीचे परिणाम जास्तींत जास्त मंडळींवर होणार आहेत.

सरकारी कारभारांतील काटकसरीच्या स्थळांचा शोध सतत चालू राहील, असें अर्थमंत्र्यांनीं पुन्हां पुन्हां आग्रहानें सांगितलें आहे.

—संजय

---

### दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लि.

नवीन बँकिंग कंपनी कायद्याप्रमाणें ही कंपनी आतां संपूर्ण बँकिंगचा धंदा करूं लागली आहे. बँक झाल्यापासून ह्या वर्षांचा हा दुसरा अहवाल आहे. भांडवल वाढीस सरकारी धोरणामुळें सुतें परवानगी मिळत नसली, व त्यामुळें भागविक्रीनें भांडवलवाढ करतां आली नाहीं, तरी ठेवी वगैरे मिळवून धंदा वाढविण्याच्या प्रयत्नांत चालकांना अभिनंदनीय यश प्राप्त झालें आहे. बँकेचे एक प्रमोटर व प्रारंभापासूनचे अध्यक्ष रा. ब. शेंबेकर, यांनीं १० लक्ष रु.चा ट्रस्ट करून त्याचें काम बँकेकडे विश्वासानें सोंपविलें आहे. श्री. व. वि. वर्तक कारखानदार ह्यांच्या सक्रिय मदतीचाही गौरवपर उल्लेख डायरेक्टरांच्या रिपोर्टांत करण्यांत आला आहे. मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. का. बा. साळवेकर, ह्यांना अशा प्रकारचें सहकार्य लाभत असल्यामुळें त्यांच्या निरलस प्रयत्नास अभिनंदनीय यश येत आहे. १९५० अखेर संपलेल्या वर्षी बँकेस ३,४९४ रु. नफा झाला. ४% करमाफ डिव्हिडंडला २,६०० रु. लागतील. ७०१ रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग होतील.

( चेअरमन : गंगाधर शिवराम आडकर, वकील.
मॅनेजिंग डायरेक्टर : काशिनाथ बाळकृष्ण साळवेकर ).

**संक्षिप्त ताळेबंद**

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ६५,००० | रोख व बँकांत | ३,२२,३५२ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ८,७५० | कॉल मनी | १,००,००० |
| ठेवी | ११,१५,२९७ | बिलें | २,३७,६२३ |
| निव्वळ नफा | ३,४९४ | इनव्हेस्टमेंटस | २,६०,८४३ |
| | | कर्जें | २,३८,५५७ |

---

पॉवर अल्कोहलमुळें झालेली बचत–पेट्रोलमध्यें पॉवर अल्कोहल मिसळून असें तेल वापरण्यामुळें सुमारें ४० लाख गॅलन पेट्रोलची बचत झाली, असें भारतीय व्यापार मंत्र्यांनीं नुकतेंच जाहीर केलें. ह्या तेलामुळें एंजिनें बिघडतील वगैरे समजुती निराधार ठरल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

## रुपयाची ससेहोलपट.

( व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम. )

१९४९ सालच्या सप्टेंबरांत इंग्लंडनें पौंडाची डॉलरमधील किंमत उतरविली; त्याबरोबर हिंद सरकारनें रुपयाची तितक्या प्रमाणांत पौंडांतील किंमत उतरविली. युद्धोत्तर परिस्थितींतून डोकें वर काढण्याकरतां, परदेशांचीं कर्जें फेडण्याकरतां व दैनंदिन जीवन जगण्याकरतां, इंग्लंडला निर्यात व्यापार शक्य तितक्या उपायांनीं वाढवणें जरूर होतें. तेवढ्याकरतां पौंडाची किंमत जगाच्या बाजारांत उतरवणें हा एक तात्पुरता पण हमखास उपाय इंग्लंडनें योजला. त्यावेळच्या परिस्थितीवरून, जगांत व्यापारी स्पर्धा पुन्हां सुरू होऊन मालवाल्यांची सद्दी संपुष्टांत येऊं लागली होती व पुन्हां जगाच्या बाजारांतील निर्यात व्यापाराचें आपलें स्थान सांभाळणें हिंद सरकारला जरूर वाटलें, व त्याचबरोबर आमच्या स्टर्लिंग शिलकेला कांहीं हालचाल न केल्यास इंग्लंडच्या नव्या हुंडणावळीनें कागदावरच्या कागदावरच कात्री लागण्याची भीति उत्पन्न झाली. तेव्हां हिंद सरकारनें तडकाफडकी रुपयाची स्टर्लिंगपाठोपाठ किंमत उतरविली. हिंदला डॉलरपूलला हात लावायचा तर स्टर्लिंगच्या द्वारा जावें लागत होतें तेव्हां त्यामुळें रुपयाची डॉलरमधील किंमत उतरविणें भागच होतें.

पण कोरियाच्या युद्धामुळें बाजारांची परिस्थिति पुन्हां एकदा पालटून सर्व देशांना युद्धोपयोगी कच्चा-पक्का माल भरून ठेवणें जरूर वाटूं लागलें. विशेषतः अमेरिकेला अशा परिस्थितींत कच्चा माल निर्यात करणाऱ्या देशांना व्यापार वाढवण्याकरतां खास उपाय योजण्याची कांहींच जरूर राहिली नाहीं. हिंदची स्टर्लिंगमधील शिल्लकही घटण्याचें प्रमाण कमी होऊन हळूं हळूं ती वाढूं लागली. मात्र नित्योपयोगी आयात माल मात्र महाग पडूं लागला होता. विशेषतः औद्योगिक नव्या संभाराकरतां अमेरिकेकडे पहावें लागल्यामुळें व अमेरिकेकडूनच धान्य मिळण्याची आशा असल्यामुळें, पुन्हां एकदा रुपयाची किंमत चढवली तर बरी असा देशांत विचारप्रवाह सुरू झाला आहे. तशांत पाकिस्तानशीं नवा करार करतांना त्याच्या रुपयाची त्यांनीं अट्टाहासानें न बदललेली किंमत हिंदनें मान्य केली. त्यामुळें मानहानि झाल्यासारखें वाटून चढ्या रुपयाची लोकांना तळमळ लागल्याचें दिसून येत आहे. कॅनडानें त्यांचा डॉलर कांहींसा मोकळा सोडला, स्वित्सर्लंडनें फ्रँक मोकळा सोडला, आस्ट्रेलिया त्याच विचारांत आहे, तेव्हां खरोखर आपल्यालाही तेंच केलें पाहिजे अशी कांहींशी खात्री होत चालली आहे.

थोडक्यांत मूलतत्त्वांबद्दल सांगावयाचें तर जागतिक दैनंदिन व्यवहार नीट चालावेत येवढ्याकरतां सोन्यांत प्रत्येकाच्या नाण्याची किंमत ठरवली गेली पाहिजे व तशी सध्या इंटरनॅशनल मॉनिटरी फंडाकडे नोंद आहे. नाण्याची किंमत वारंवार बदलल्यानें व्यवहारांत घोटाळे, साशंकता व अविश्वास उत्पन्न होतो, तेव्हां ती बदलूं नये असें जुने क्लासिकल अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादतात. या उलट परिस्थितीबरोबर व स्वतःचा जीव बचावण्याकरतां हुंडणावळींत फरक करावा लागला तर तो खुशाल करावा असें इंग्लंड, जपान, सारखे देश १९२२ सालापासून करीत आले आहेत. एका बरोबर सर्वांनीच हुंडणावळ बदलली तर अर्थात कुणाचाच फायदा-तोटा होत नाहीं व झालाच तर फारतर तात्पुरता फायदा होतो, तेव्हां दर बदलणें ही निव्वळ मलमपट्टी होय. आर्थिक प्रकृति सुधारावयाची तर त्याचे दुसरे कष्टाचे मार्ग आहेत. उत्पादन वाढवावें लागतें. त्याला वेळ, श्रम व भांडवल लागतें. तेव्हां तो मार्ग हळूहळूच आचरावा लागतो. तें करण्याला संकटसमयीं सवड नसते. तेव्हां किंमत उतरवणें श्रेयस्कर ठरतें. अर्थशास्त्र ह्याप्रमाणें एक आणि नित्य नाहीं, तें माणसांचें आहे; माणसें अनित्य व अनेक आहेत; अर्थशास्त्रही अनित्य बनत गेल्यास नवल नाहीं. जुन्या अर्थशास्त्रज्ञांनीं बसविलेले नियम त्यांच्या अठराव्या-एकोणिसाव्या शतकांतील अनुभवावरून बसवलेत; ते युद्धपीडित विसाव्या शतकांतील माणसांना लागू करूं पहाण्याची जरूर नाहीं. आम्हीं नवीन नियम बसविण्याच्या नीतिकल्पनांच्या विचारापेक्षां, सध्याच्या अर्थविचारांत ज्याच्या हातांत सत्ता तो पारधी हें तत्त्व प्रामुख्यानें मिरवत आहे.

पाकिस्तान कच्चा माल उत्पन्न करतो. त्याची जगाला कायम जरूर लागणार. तेव्हां झक मारत जग त्याच्याकडे माल घेण्याला जाईल व तो सांगेल ती त्याच्या रुपयाची किंमत देईल. तो एक स्वतंत्र देश झाल्यामुळें त्याच्या रुपयाची किंमत अशी अगर तशी असावी असें सांगण्याचा कुणालाच अधिकार पोंचत नाहीं. हिंदच्या जॉन मथाईनीं अर्थ-मंत्री असतांना त्याबद्दल व्याख्यान झोडलें तें अत्यंत अप्रस्तुत होतें. श्री. देशमुखांनीं नवा करार करतांना पाकची ही भूमिका ओळखून संयम राखून करार केला हें लोकांना मानहानिकारक वाटलें, हें निव्वळ व्यापारी-पद्धतीचें व परिस्थितीचें अज्ञान होय. वास्तविक श्री. देशमुखांनीं खऱ्या मुत्सद्याप्रमाणें काम केलें आहे, व्यापारांत कसला मान अन् अपमान ! तिथें फक्त माल व पैसा ! माल हवा तर पैसा द्या, पैसा नसेल तर माल घेऊं नका. तुम्हीं माल घेतला नाहींत तर उद्या मालकाला येईल त्या किंमतीला तो माल फुंकून टाकील असें हें कालचक्र चालावयाचें.

हिंदला स्वतःच्या आर्थिक प्रकृतीची नीट जाणीव पाहिजे ! आम्ही कुठें मजबूत आहोंत, कुठें नरम आहोंत हें आमचें आम्हांला कळलें पाहिजे. तें ओळखण्यांत कमीपणा नाहीं, जास्तपणा नाहीं. आज रुपयाची किंमत वाढविली तर फायदा होणार आहे का ? पूर्वी उतरली ती चूक झाली का ? या प्रश्नांचीं तरतम उत्तरें काढून धोरण आंखणें आजच्या मुत्सद्यांचें काम आहे.

---

**राष्ट्रीयीकरण केलें जाणार नाहीं**—मद्रास राज्यांतील कोणत्याहि धंद्याचें राष्ट्रीयीकरण केलें जाणार नाहीं; उलट, खाजगी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचेंच सरकारचें धोरण आहे, असें मद्रास राज्याचे उद्योगमंत्री श्री. रेड्डी ह्यांनीं विधिमंडळांत सांगितलें. मद्रास राज्यांत कागदाचा कारखाना काढण्यास भांडवलदारांना मदत देण्यास सरकार तयार आहे, असेंही ते म्हणाले.

**नभोवाणी व जाहिराती**—अखिल भारतीय नभोवाणीवरून कोठल्याही प्रकारच्या मालाची जाहिरात करूं दिली जाणार नाहीं, असें माहिती खात्याचे मंत्री ना. दिवाकर ह्यांनीं जाहीर केलें आहे.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.**



( स्थापना १९१८ )

बचतीच्या विविध योजना

हेड ऑफिस— गिरगांव, मुंबई.

शाखा : दादर, माहीम, बेळगांव

## भारताचा पेन्सिलीचा धंदा

भारताच्या मध्यवर्ती सरकारनें आणि राज्य–सरकारांनीं लोकांना साक्षर करण्याच्या निरनिराळया योजना हातीं घेतल्या आहेत. खेडेगांवीं लोकांच्या हातीं पैसाही अधिक खेळूं लागला आहे. ह्या व इतर कारणांमुळें येत्या तीन वर्षांत भारतांत पेन्सिलींना चांगली मागणी येण्याचा संभव आहे. ह्या कालांत पेन्सिलींची मागणी ५ लाख ग्रोसपर्यंत वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे. धंद्याची सध्याची उत्पादनक्षमता ४॥ लाख ग्रोस एव्ढी आहे. परंतु प्रत्यक्ष उत्पादन मात्र ५०,००० ग्रोसपेक्षां अधिक होत नाहीं. युद्धोत्तर कालांत परदेशांतून पेन्सिलींची आयात होऊं लागली, त्यामुळें ह्या धंद्याला कांहीं काळ जरा चिंतेचा गेला. परंतु आतां टॅरिफ बोर्डानें संरक्षण दिल्यामुळें उत्पादन वाढूं लागलें आहे.

पेन्सिलींच्या धंद्याला सर्वांत अधिक ऊर्जितावस्था युद्धकाळांत प्राप्त झाली होती. १९४६ सालीं भारतांतील कारखान्यांनीं १,१०,००० ग्रोस पेन्सिली तयार केल्या. त्यांत काळ्या, रंगाच्या आणि नकल करण्यास लागणाऱ्या अशा सर्व प्रकारच्या पेन्सिली होत्या. अर्थात, युद्धकाळांत परकीय मालाची आयात बंद होती हें लक्षांत ठेवलें पाहिजे. युद्धकाळापूर्वी भारताची पेन्सिलींची गरज मुख्यतः परकीय मालाच्या आयातीनेंच भागविली जात असे. भारतांत सुमारें ४ लाख ग्रोस पेन्सिलींची आयात होत असे. १९४६ सालानंतर चांगल्या दर्जाचा परकीय माल भारतांत खूप मोठ्या प्रमाणावर आयात होऊं लागला. त्या मालाशीं स्पर्धा करणें भारतीय कारखान्यांना अशक्य होऊं लागलें; कित्येक कारखान्यांना आपलें उत्पादन कमी करावें लागलें आणि सरकारकडे मदतीची व संरक्षणाची मागणी करण्यांत येऊं लागली. टॅरिफ बोर्डानें ह्या परिस्थितीचा विचार करून धंद्याला संरक्षण देण्याची शिफारस केली. ती मान्य करून चालू सालच्या जानेवारी महिन्यापासून शिसपेन्सिलींच्या आयातीवर तीस टक्के, रंगित व कॉपिंग पेन्सिलीच्या आयातीवर ३७॥ टक्के संरक्षक जकात बसविण्यांत आली आहे. फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूटनें अशी सूचना केली आहे कीं देवदारी लाकूड पेन्सिलीसाठी वापरतां येण्यासारखें आहे. संयुक्त प्रांत, पंजाब आणि काश्मीर ह्या राज्यांतून देवदार मिळूं शकतें. उत्तर बंगालमध्यें सायप्रसचीं झाडें आहेत. त्याचाहि उपयोग शिसपेन्सिलीच्या लाकडासाठी करणें शक्य आहे असें म्हणतात. ह्या सर्व सूचनांचा सध्यां विचार चाल आहे. परदेशांतून येणाऱ्या आयातीवर निर्बंध घातल्यामुळें पेन्सिलींचा सांठा कमी झाल्याचें दिसत नाहीं. उलट त्यामुळें देशी पेन्सिलीची मागणी वाढली आहे. कांहीं हिंदी कारखान्यांनीं आपलें उत्पादन वाढविलें आहे आणि आपल्या मालाचा दर्जाहि सुधारला आहे. ही सुधारणा काळया पेन्सिलीबावत विशेष झाल्याचें दिसून येतें. देशी मालाविरुद्ध ग्राहकांचा जो वाईट पूर्वग्रह झाला होता तो आतां निवळूं लागला आहे. भारतीय सरकारनें आपल्या खात्यांना अशा सूचना दिल्या आहेत कीं त्यांनीं शक्यतोंवर आपल्या सर्व गरजा देशी कारखान्यांचा माल विकत घेऊन भागवाव्या. ह्या धंद्याला संरक्षण दिल्यामुळें त्याची कितपत प्रगति झाली तें १९५१ डिसेंबर अखेर टॅरीफ बोर्ड पहाणार आहे. ह्या फेरतपासणीच्या निकालावर त्यानंतर संरक्षण द्यावयाचें कीं नाहीं तें अवलंबून रहाणार आहे. भारतीय कारखानदार ह्या संधीचा फायदा घेऊन उत्पादन खर्च व दर्जा ह्या दोन बाबतींत प्रगति करतील तर हा धंदा भक्कम पायावर उभा रहाणें सहज शक्य वाटतें; आणि तसें झालें तरच संरक्षक जकातीचा हेतु साध्य झाला असें म्हणतां येईल. नाहीं तर ग्राहकांना अधिक किंमत द्यावी लागून शिवाय धंदा डळमळीत स्थितींत रहाण्याची भीति आहे.


### दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७

हेड ऑफिसः—हायस्कूल रोड, सांगली.

शाखाः—१ जत, २ मिरज.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें ,, | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चे वर. |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

सरकारतर्फेः—

मे. भ. अं. दप्तरदार, B. A., चेअरमन.
मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.
मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.
मे. अ. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यांतर्फेः—

मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.
मे. हिं. म. पाटील.
मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फेः—

मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
मे. सु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर. — भ. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.



( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

### दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. — के. डी. शिराळकर मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.